Shri Sharada Bhavan Education Society's
**YESHWANT MAHAVIDYALAYA, NANDED-431602 (M.S.)**
(Affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)
**NAAC Reaccredited "A" Grade (III$^{rd}$ Cycle)**
**'COLLEGE WITH POTENTIAL FOR EXCELLENCE STATUS'**
**UG**-Arts, Science,Commerce, B.Sc.(C.S.), B.Sc.(B.T.), **PG**-Economics, History, English, Sociology, M.Com., Chemistry, Zoology, Environmental Science, Microbiology, Computer Science, Dairy Science, MCM, Information Technology, Biotechnology, Electronics,Botany, PG Diploma in Tax Procedure & Practice, PG Diploma in Electronics/Embedded System Design, **Research Center** in Biotechnology, Botany & Horticulture, Chemistry, Commerce, Computer Science & Information Technology, Dairy Science, Economics, Electronics, English, Environmental Science, Hindi, History, Marathi, Mathematics & Statistics, Microbiology, Political Science, Physics, Urdu & Zoology)
**Establishment Year: 1963**

| Hon'ble Shri Ashokrao Chavan | Shri D.P.Savant | Dr.Ganeshchandra Shinde |
|---|---|---|
| President | Secretary | Principal |

Phone No.s:- (02462) 254170, 254487(Office), 253726(Fax)
**website: www.ymnnanded.in Email: principalymn@gmail.com**

**Ref.No.: 2022-2023/** **Date:01-10-2022**

# महत्त्वाची सूचना

वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की 'नवीन शैक्षणिक धोरण-२०२०' नुसार आपल्या उच्च शिक्षणाचे स्वरूप बदलत असून यामध्ये नवीन संरचना आणि संकल्पनांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

यामध्ये बहुविध प्रवेश/प्रस्थानबिंदू (Multiple Entry - Exit Points) ही एक संकल्पना आहे. आपणाला हे ठाऊक आहे की,विद्यार्थी उच्च शिक्षणात प्रवेश घेतो ; परंतु त्यास अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. प्रथम वर्ष पूर्ण केल्यानंतर आर्थिक जबाबदाऱ्यांमुळे अनेकांना नोकरी करावी लागते. अशावेळी विद्यार्थी प्रथमवर्ष पूर्ण करण्याचे प्रमाणपत्र स्वत:जवळ ठेवू शकेल. आणि यासोबत प्रस्तुत वर्षात शिक्षण घेत असताना मिळालेले क्रेडिट त्याला ॲकेडमिक क्रेडिट बँकेत सुरक्षित ठेवता येतील.

हे क्रेडिट विद्यार्थ्याच्या डीजिटल लॉकरमधे (ॲकेडेमिक क्रेडिट बँकेत) सुरक्षित राहणार असल्याने विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक प्रगतीसाठी याचा मोठा फायदा होऊ शकणार आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशीनुसार विद्यापीठाच्या माध्यमातून ई- गव्हर्नन्स डीव्हीजनने शैक्षणिक श्रेयांक बँक प्लॅटफॉर्म डिजिलॉकर फ्रेमवर्कखाली विकसित केले आहे. **विद्यार्थ्यांनी आपल्या मोबाईलवर DigiLocker हे ॲप्लिकेशन (App) डाऊनलोड करुन यावर आपली नावनोंदणी करावी. नावनोंदणी करतांना विद्यार्थ्यांनी आपला Username & Security Pin लिहून ठेवणे अनिवार्य आहे.** तरी सर्व विद्यार्थ्यांनी (Academic Bank of Credits) शैक्षणिक श्रेयांक बँकेचे खाते तयार करुन घ्यावे. त्यासाठी https://www.abc.gov.in/ या वेबसाईटचा वापर करावा विद्यार्थ्यांना शैक्षणिक श्रेयांक बँकेचे खाते (Academic Bank of Credits Account) तयार करतांना काही अडचण आल्यास वरिष्ठ महाविद्यालय कार्यालय खिडकी क्रमांक 03 येथे श्री गजानन अं. पाटील, कार्यालयीन अधीक्षक (शैक्षणिक) यांच्याशी संपर्क साधावा.

(डॉ.गणेशचंद्र शिंदे)
PRINCIPAL
Yeshwant Mahavidyalaya
NANDED.
01.10.2022

॥ या विद्या या विमुक्तये ॥
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with B++ Grade
## Office of the Director, Board of Examination & Evaluations
Phone : (02462) 215242 | website: srtmun.ac.in | e-mail: directorboee@srtmun.ac.in

जा.क्र : परीक्षा/एबीसी/२०२२/1149 दि. ३० सप्टेंबर २०२२

—: परिपत्रक :—

यशवंत महाविद्यालय
नांदेड
आवक क्र. 1010-2022-2023
दिनांक व सही 01/10/2022

प्रति,
मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये,
मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ, नांदेड
मा. संचालक, प्रस्तुत विद्यापीठ उपकेंद्र लातुर,
मा. संचालक, प्रस्तुत विद्यापीठ उपकेंद्र परभणी,
मा. प्राचार्य, न्यु मॉडेल डीग्री कॉलेज, हिंगोली

विषय : विद्यार्थ्यांनी ( Academic Bank of Credits ) शैक्षणिक श्रेयांक बँकेचे खाते उघडण्याबाबत

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते कि, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० च्या शिफारशीस अनुसरुन विद्यापीठ अनुदान आयोगा नवी दिल्ली यांनी शिक्षण मंत्रालयाच्या सहमतीने "विद्यापीठ अनुदान आयोग ( उच्च शिक्षणात शैक्षणिक श्रेयांक बँकेची स्थापना आणि संचालन ) विनियन, २०२१" हे भारताच्या राजपत्रात दिनांक २८ जुलै, २०२१रोजी अधिसूचित केले आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी मंत्रालयाच्या राष्ट्रीय ई – गव्हर्नन्स डिव्हिजनने शैक्षणिक श्रेयांक बँक प्लॅटफॉर्म डिजिलॉकर फ्रेमवर्कखाली विकसित केले आहे.

तरी सर्व संलग्नीत महाविद्यालयातील व संकुलातील विद्यार्थ्यांनी स्वत:चे शैक्षणिक श्रेयांक बँकेचे खाते ( Academic Bank of Credits account ) तयार करुन घ्यावे. त्यासाठी https://www.abc.gov.in/ या वेब साईटचा वापर करावा.

तसेच संलग्नीत महाविद्यालयाने व संकुलातील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक श्रेयांक बँकेचे खाते उघण्याबाबत प्रोत्साहित करावे, व त्यासाठी जबाबदार व्यक्तीची नेमणूक करण्यात यावी.

R/IQAC(Acad)/(HOD)
Circulate
Kshirsagar
01/10
1-10-22

आपला,
30/9/22
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ